**नि.फौ.ख.क्र.१०/२०१५**
सरकार – वि.- आरीफ शेख
**निशाणी क्र. ३२**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र. ३ -</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – अमित लक्ष्मण गवारी- **तपास अधिकारी**
वय – ३६ वर्षे, व्यवसाय – पो.ह., ब.नं. ७०, स्थानीक गुन्हे शाखा, पुणे,
सध्या रा. - रेल्वे पोलीस लाईन वसाहत, पुणे.

**<u>फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २९९ प्रमाणे, सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.एस.काशीद यांचे मार्फत सुरु-</u>**

सन २०१५ मध्ये मी स्थानीक गुन्हे अन्वेषण शाखा, लोहमार्ग पोलीस स्टेशन, पुणे येथे पोलीस नाईक या पदावर कार्यरत होतो. गुन्हा क्र. १९४/२०१४ चा तपास मी केलेला आहे. दि. १९/०९/२०१४ रोजी माझी नेमणुक पुणे रेल्वे स्टेशन येथे गुन्हेगारांवर लक्ष ठेवण्याकरीता केलेली होती. माझे सोबत त्यावेळी पो.शि.राक्षे, पो.शि.मुळे, पो.ह. सोनवणे हे लोक होते. आम्ही प्लॅटफॉर्म क्र. ४ वर गस्त करत होतो. सकाळी १०.०० ते १०.१५ वाजण्याच्या सुमारास एक इसम आम्हाला संशयीतरित्या आढळला. आम्ही त्याची विचारपुस केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. आम्ही त्यास पोलीस स्टेशनला घेवुन आलो. तो रेकॉर्डवरील वरील आरोपी असल्याचे समजले. त्याने त्याचे नाव आरीफ शेख असे सांगितले. त्याने चौकशीमध्ये कबुल केले की, १० ते १५ दिवसापुर्वीच्या लोकल ट्रेनमध्ये एका प्रवाशाचे पाकीट चोरले आहे. गुन्हयातील २४००/- पैकी काही पैसे खर्च केल्याचे सांगितले. आम्ही गुन्हयाचे रजिस्टर तपासले असता सदरचा गुन्हा हा गुन्हा क्र. १९४/२०१४ कलम ३७९ भा.दं.वि मधील असल्याचे निष्पन्न झाले. मी त्यास अटक केली. त्याचा दोन पंचा समक्ष अटक पंचनामा **नि.क्र. २६** केला. तो तोच असुन त्यावर माझी, पंचाची व आरोपीची स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

२. दि. २०/०९/२०१४ रोजी आरोपीने स्वेच्छेने निवेदन दिले. दोन पंचा समक्ष निवेदन पंचनामा केला. सदरील पंचनामा ११.०० वाजता सुरू करुन ११.३० वाजता पुर्ण केला. त्याने निवेदनात सांगितले की, गुन्हयातील १२००/- रुपये त्याचे राहते घरी ठेवलेले आहेत ते काढुन देतो. आता मला निवेदन पंचनामा नि.क्र. २७ दाखवण्यात आला. तो तोच असुन खरा व बरोबर आहे. आम्ही त्यानंतर स्टेशन डायरी नोंद करुन सरकारी वाहनाने आरोपीच्या राहते घरी दापोडी येथे गेलो. त्याने त्याचे घरातील किचनमधुन १२००/- काढुन आम्हाला दिले. मी सदरचे पैसे जप्त करुन जप्ती पंचनामा तयार केला. आता मला जप्ती पंचनामा नि.क्र. २८ दाखवण्यात आला. तो तोच असुन खरा व बरोबर आहे. तपासा दरम्यान मी साक्षीदारांचे जबाब नोंदवले. आरोपीविरुध्द सबळ पुरावा आढळुन आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. तपासात मला असे आढळले की,

प्रस्तुतचा गुन्हा आरोपीने केलेला आहे. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपी हा फरार असल्याने उलटतपास नाही.</u>**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.01.21 17:38:48 +0530

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.
दि. २१/०१/२०२६